# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १० मे २०२४ (शुक्रवार)

.........................................................................................................

### चोरी करणा—या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन पारशिवनी येथे फिर्यादी नामे—रमेश रामजी बघमारे वय ६६ वर्ष रा बच्छेरा ता पारशिवनी यांनी रिपोर्ट दिला कि, फिर्यादी हे दत्तुभाउ सावरकर यांच्या मालकीची ०६ एकर शेती मागील ५ वर्षापासुन ठेक्याने करीत असुन सदर शेतीमध्ये एक लहान मातीविटेने बांधलेला खुला गोठा आहे त्यामध्ये फिर्यादी हे नेहमी गाई व बैल बांधत असतात. दिनांक **१८.०४.२०२४** रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ०८.०० वा दरम्यान शेतामध्ये गेले असता शेतातील गोठ्यात ठेवलेले बैलबंडीचे दोन लोखंडी चाकापैकी एक लोखंडी कि ३०००/—रू चा चाक तसेच बंडीचे लोखंडी ॲक्सल कि २०००/—रू असा एकुण ५०००/—रू चा माल दिसुन आला नाही. सदर माल गोठ्यातुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे रिपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद असुन तपासात होता. सदर गुन्हयाचा सखोल तपास व चौकशी करून सदर गुन्हयातील **आरोपी नामे— प्रविन सुखदेव सिंदराम वय ३३ रा बच्छेरा** ता पारशिवनी यास बारकाईने विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यास नमुद गुन्हयात दिनांक ०९.०५.२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार साहेब, मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नाग्रा. यांचे मार्गदर्शनात ठाणेदार राजेश थोरात, पोलिस उपनिरीक्षक भताने, सफौ उकेबोंन्द्रे, पोना तभाणे, चालक पोहवा अनिल देशमुख यांचे पथकाने यांनी पार पाडली

## धान्य चोरी करणा—या आरोपींस अटक

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे फिर्यादी नामे— अमोल शंकरराव रेवतकर वय ३३ वर्ष रा वार्ड क्र ७ मोहपा यांनी रिपोर्ट दिला कि, त्यांचे शेत ५ एकर शेत हे मौजा मोहगाव शिवारात असुन त्या शेतात पराटी व तुरी लावल्या होत्या. यंदा फिर्यादीला ४ क्विंटल तुरी झाल्या असुन सदर पिक हे ५ चुमडीत भरून शेतातील गोठ्यात ठेवल्या होत्या. दिनांक १९.०३.२४ रोजी फिर्यादी हे शेतात गेले असता त्यांा ५ तुरी भरलेल्या चुमड्यापैकी ४ चुमड्या कि १५०००/—रू दिसल्या नाही. तेव्हा फिर्यादीचे वडीलांनी तुरीच्या चुमडीविषयी विचारणा केली असता माहीत नसल्याचे सांगितले, कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे ४ चुमड्या कि १५०००/—रू चे चोरून नेल्याचे रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयातील तपासात फिर्यादीचे शेतातील गोठ्यात जावुन पाहणी केली असता एका मातीच्या मटकामध्ये एक चुमडी खोचुन ठेवलेली दिसुन आली त्या चुमडीवर शंकरराव भोयर असे नाव नमुद होते. तेव्हा सदर आरोपीने चोरी केल्याची खात्री झाल्याने आरोपीस ताब्यात घेवुन सखोल विचारपुस करून बारकाईने चौकशी केली असता यातील आरोपी याने सदर ची चोरी केल्याचे कबुली दिल्याने त्यांना दिनांक ०९.०५.२०२४ रोजी अटक करून पुढील तपास सुरू आहे. पुढील तपास पोलीस हवालदार संजय वानखेडे हे करीत आहेत.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक मा. श्री रमेश धुमाळ साहेब, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठानेदार श्री योगेश कामाले, पोलीस हवालदार संजय वानखेडे, किशोर लोही यांचे पथकाने पार पाडली.

## अवैधरीत्या देशी दारू विक्री करणा—या आरोपीवर कारवाई

दिनांक ०९/०४/२०२४ रोजी यातील फिर्यादी हे अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोस्टे हद्दीत फिरत असता मुखबिरद्वारे विश्वसनिय माहीती मिळाली की सुरज गजभीये रा खरसोली हा आपले घरी अवैधरित्या, विनापरवाना देशी विदेशी दारू बाळगुन विक्री करतो. अश्या खबरेवरून सदर ठिकाणी छापा टाकला असता **आरोपी नामे— सुरज उर्फ भुरा हरिभाऊ गजभिये वय २७ वर्ष रा. खरसोली ता. नरखेड जि. नागपुर** यांचे राहते घराची दारूबाबत घरझडती घेतली असता त्यांचे राहत्या घरात १) ४८ निपा देशी दारु संत्रा न —१ डिल्क्स १८० एम. एल क्षमतेच्या प्रति निप ७० रुपये किमती ३३६०/— रु २) ६ निपा रॉयल ग्रिन व्हीस्की विदेशी दारु १८० एम एल क्षमतेच्या प्रति निप २०० रु प्रमाने १२००/— रु ३) २० निपा ऑफिसर चॉईस ब्ल्यु विदेशी दारु प्रत्येकी १८० एम.एल प्रति निप १५० रु प्रमाने ३०००/— रु ४) १८ निपा मॅकडॉल न—१ विदेशी दारु प्रत्येकी १८० एम.एल प्रति निप १५० रु प्रमाने २७००/— रु असा एकुण १०,२६०/— रुपयाचा मुद्देमाल अवैधरित्या विनापरवाना मिळून आल्याने सदर माल जप्त करण्यात आला. नमुद आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम ६५(ई), महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, यांचे मार्गदर्शनात सपोनि कृष्णा तिवारी, पोहवा कुणाल आरगुडे, पोलीस अंमलदार सुरज मोहीकर, मपोशि विजया यांचे पथकाने पार पाडली.

## गैरकायद्याची मंडळी जमवुन अवैधरित्या तलवार बाळगल्याप्रकरणी आरोपीस अटक

यातील फिर्यादी नामे– अतुल अशोक तीवारी वय २७ वर्ष रा. वार्ड क्र ३ रा कांद्री कन्हान हा आपले मोटर सायकल क्र एम एच ४० एडी ७६१६ ने आपले घरी जात असता पिपरी येथे सलीम ज्वेलर्स समोर यातील आरोपी नामे– १. कपील रंगारी , २. कमलेश मेश्राम, ३. अमन खान, ४. अतुल यादव, ५. मनोज राय हे ३ मोटर सायकल घेवुन फियादीला अडवुन अश्लील भा ोत शिवीगाळ करून थांबविले असता, फिर्यादी थांबले असता, फिर्यादीचे मागुन यातील आरोपी नामे– कपील रंगारी याने कॉलर पकडले व कमलेश मेश्राम याने त्याच्या हातातील असलेला लाल दुप्पटयातील लपवुन ठेवलेली तलवार काढली त्यामुळे फिर्यादी घाबरून तिथुन पळुन गेला. त्यानंतर आरोपीतांनी तिथे सोडलेली फिर्यादीचे मोटर सायकलवर तलवारीने ३ ते ४ वार करून मोटर सायकलचे नुकसान केले. अशा फिर्यादीचे तोंडी रीपोर्टवरून नमुद आरोपीविरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम १४३,१४४,३४१,२९४, ४२७ भादवि सह ४,२५ आर्म ॲक्ट अन्वयें गुन्हा नोंद करून तपासात घेतला. सदर आरोपींना पकडण्याकरीता पथक तयार करून यातील आरोपी नामे १)अमन खान २) मनोज राय रा कांद्री कन्हान यांना अटक केले असुन उर्वरीत आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास सपोनि बावनकर मो क्र ९६२३७५५४१४ हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील , सपोनि बावनकर, व त्यांचे पथकाने पार पाडली.

## इकारेंज ग्रीन एनर्जी सोल्युशन प्रायवेट लिमीटेड, ब्राम्हणी कळमेश्वर कंपनीचे नावावर गुंतवणुकदारांना महीना ३ ते ५ परसेंट लाभांश देण्याचे आमिष दाखवुन गुंतवणुकदाराची कोंटीची फसवणुक

पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील ब्राम्हणी येथील इकोरेंज ग्रीन एनर्जी सोल्युशन प्रायवेट लिमीटेड येथे एजंट म्हणुन काम करतो. अशी बतावणी करून कंपनीला हातउसने स्वरूपात पैशाची गरज भासवुन पैशाची गुंतवणुक करा त्याचा तुम्हाला चांगला व्याज मिळेल अशी विश्वासार्ह माहीती देवुन कंपनीचे संचालक आरोपी नामे १. इश्वर शेषराव भलावी व २. शैलेश शंकूरराव चौधरी तसेच सोबत काम करणारे ३. सचिन यावलकर यांनी गुंतवणुकदारांना ५ टक्के तसेच ३ टक्के प्रती महीना लाभांश देण्याचे आमीष दाखवुन तसेच गुंतवणुकदारांना काही दिवस लाभांश प्रती महीना देवुन त्यानंतर ना लाभांश ना मुद्दल काहीही परत न करता ७५ लाख १० हजार रूपयांची एकुण ९ गुंतवणुकदारांची फसवणुक केल्याचे फिर्यादी नितेश पंढरीजी तक्रीत यांचे तक्रारीवरून पो स्टे कळमेश्वर येथे भारतीय दंड संहितेचे कलम ४२०,४०६,४६७,४६८,४७१,३४ भादवि तसेच प्रक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ व महाराष्ट्र ठेविदारांचे संरक्षण कायदा १९९९ चे कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयात आरोपी क्र १. इश्वर शेषराव भलावी २.शैलेश शंकूरराव चौधरी व ३. सचिन रामचंद्र यावलकरय यांना अटक केलेली आहे. आरोपीतांकडे विचारपुस केली असता त्यांनी दोनशेच्या वर गुंतवणुकदाराची

जवळपास दहा कोटी रूपयांचे वर रक्कम जमा करून ती रक्कम कंपनीमध्ये न वापरता आपले वैयक्तीक कामाकरीता वापरल्याचे व गुंतवणुकदारांची फसवणुक केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्री अनिल मस्के, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग करीत आहेत. वरील कंपनीत गुंतवणुक करा म्हणुन आरोपीतांनी जर अजुन कुणाची फसवणुक केली असल्यास त्यांनी आम्हास अथवा पो स्टे कळमेश्वर येथील ठाणेदार श्री योगेश कामाले, यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन श्री अनिल म्हस्के, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांनी केलेले आहे.

**संपर्क :– १. श्री योगेश कामाले, ठाणेदार पोस्टे कळमेश्वर मो नं ९८२३९८०५४५**

**२. श्री दत्तात्रय कोलटे पोउपनि पोस्टे कळमेश्वर मो नं ८०८०९५५५८९**

**३. पोहवा/१८२४ अंकुश लाखे पोस्टे कळमेश्वर मो नं ९९२३९६७६३०**

**४. पोहवा/१९४६ प्रजोक तायडे पोस्टे कळमेश्वर मो नं ८३०८९६४७१४**

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**